अतारांकित प्रश्नोत्तरांची ९७ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबईत आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र उभारण्याबाबत

(१) ६३९६ (१०-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई देशाच्या आर्थिक राजधानीत आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र उभारण्याची योजना केंद्र शासनाने बंद केली असल्याचे दिनांक ६ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सदर केंद्र मुंबईत उभारावे यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कोणती आग्रही मागणी केली वा करण्यात येत आहे,

(३) अदयाप, याबाबत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) : (१) मुंबई येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र उभारण्याची योजना केंद्र शासनाने बंद केली असल्याबाबतची माहिती आयुक्त, सीप्झ, विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ), भारत सरकार, अंधेरी (पूर्व) यांनी अद्याप राज्य शासनास अवगत केलेली नाही.

(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ०६ जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये विशेष आर्थिक क्षेत्र कायदा, २००५ (SEZ Act) अंतर्गत विहीत नमुन्यात अर्ज करून विकास आयुक्त, सीप्झ, (SEEPZ), भारत सरकार यांना वांद्रे-कुर्ला संकुलामधील G-Text Block मध्ये विशेष आर्थिक क्षेत्रास (SEZ) मान्यता प्रदान करुन जागतिक वित्तीय सेवा केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्याची विनंती केली होती. तद्नंतर अर्ज छाननी दरम्यान विकास आयुक्त, सीप्झ यांनी त्यावर स्पष्टीकरण मागविले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ०८.०२.२०१७ व दिनांक १०.०२.२०१७ च्या पत्रान्वये सदर स्पष्टीकरणाची पूर्तता केली आहे.

राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या उपरोक्त प्रस्तावाच्या मंजूरीसाठी संचालक, वाणिज्य विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र विभाग, वाणिज्य व उद्योग मंत्रालय), भारत सरकार यांच्याकडे दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या पत्राद्वारे शिफारस केली आहे.

प्राधिकरणाने दिनांक ०१ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाने केंद्र शासनास केलेल्या शिफारसीचा उल्लेख करुन केंद्र शासनास Board of Approval (BOA), SEZ च्या ७५व्या बैठकीत प्राधिकरणाच्या मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलामधील जागतिक वित्तीय सेवा केंद्राचा प्रस्ताव विचारात घ्यावा अशी विनंती केली आहे.

यावर अवर सचिव, भारत सरकार यांनी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणास हया विभागामार्फत वित्त मंत्रालय (आर्थिक व्यवहार विभाग) यांच्याकडून माहिती मागविली असून ती अद्याप प्राप्त झालेली नाही असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे.

कोपरगांव (जि.अहमदनगर) येथे बिबट्यांसाठी पिंजरे लावण्याबद्दल

(२) २७१०० (०६-०५-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथे बिबट्यांचा संचार मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना शेतीला पाणी देण्याकरिता रात्री-अपरात्री शेतात जावे लागते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिबट्याच्या हल्ल्यात कित्येक शेतकरी गंभीर स्वरुपात जखमी असून या बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागामार्फत पिंजरे लावण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री. उद्धव ठाकरे (२७-०४-२०२२) : (१) कोपरगाव, जि. अहमदनगर भागात ऊसाच्या शेतीमुळे बिबट्यास कायमस्वरुपी लपण्याच्या जागा व पाण्याची सोय व उघड्या गोठ्यांमुळे सहज उपलब्ध होणारे भक्ष्य मिळाल्यामुळे बिबट्याने उसाची शेती असलेल्या भागात त्याचा अधिवास तयार केला आहे. अशा परिसरात बिबट्याने पाळीव प्राण्यांवर व मनुष्यांवर देखील हल्ले केल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२) होय हे खरे आहे.

(३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसास अथवा जखमी व्यक्तीस तसेच शेतपिक नुकसानीच्या तसेच पशुधन हानीच्या प्रकरणांमध्ये संबंधितास प्रचलित शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार आर्थिक सहाय्य अदा करण्यात येते. त्याकरीता क्षेत्रीय स्तरावर ऊणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (क) मधील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मानवी जिवितास धोकादायक असलेल्या वन्यप्राण्यास आवश्यकतेनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही देखील करण्यात येते.

बिबट्यांचा लोकवस्तीजवळ वावर कमी करण्यासाठी तसेच मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राजवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.

• मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी तसेच भक्ष्य उपलब्ध व्हावे याकरीता उपाययोजना करण्यात येतात.

• क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना ट्रॅन्क्वीलायझर गन / ब्लो पाईप, ट्रॅप कॅमेरा, पिंजरे इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

राज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

(३) ३२३४९ (०२-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील एकूण मृत्युमुखी पडलेल्या वाघांपैकी ६४ टक्के वाघांचा मृत्यु महाराष्ट्र राज्यात झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील उमरेड-करांडच्या अभयारण्यात दोन बछड्यांचा संशयास्पद मृत्यु झाला असून, यवतमाळ जिल्ह्यात एक महिन्याच्या अंतराने दोन वाघ मृत्युमुखी पडल्याचे निदर्शनास आले आहे तसेच सदर दोन्ही घटनांमध्ये 'वायर टॅप' चा वापर केला असून वाघिणीला थेट जिवंत जाळण्याची घटना माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१९ मध्ये १९ वाघांच्या मृत्यूपैकी ५ तसेच ११० बिबटे मृत्युमुखी पडले असून त्यातील १७ प्रकरणातील शिकाऱ्यांवर गुन्हे नोंदवण्यात आले असतांना अद्यापही सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन्यजीवांच्या शिकारी, त्यांच्या अवयवांचा अवैध व्यापार आणि स्थानिक शिकाऱ्यांना हाताशी धरून सक्रीय झालेल्या आंतरराष्ट्रीय टोळ्यांना शह देणारी वनखात्याची प्रशासकीय यंत्रणा कमी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील व्याघ्र प्रकल्पात निदर्शनास आलेल्या शिकारीच्या घटनेची चौकशी करून शिकाऱ्यांना शिक्षा देण्याकरिता केंद्राप्रमाणे 'राज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा स्थापन' करण्याची मागणी अनेक पर्यावरणवादी राज्य वन्यजीव मंडळ इत्यादींच्या सदस्यांनी सन २०13 पासून विविध निवेदनाद्वारे व बैठकीतून शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मागील नऊ वर्षापासून राज्यात ‘राज्य वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखा स्थापन’ करण्याचा प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२७-०४-२०२२) : (१) सन २०२० मध्ये देशात एकूण १०६ वाघांचा मृत्यु झाला असल्याचे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या (NTCA) संकेतस्थळावर दर्शविण्यात आले आहे. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात सन २०२० मध्ये १८ वाघांचा विविध कारणांमुळे मृत्यु झालेला आहे.

(२) दिनांक ०१.०१.२०२१ रोजी उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात प्रौढ वाघ-१ व बछडे-३ असे एकूण ४ वाघ विषबाधेने मृत झाल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीदरम्यान कालवडीच्या मालकाने विषप्रयोग करुन वाघाला मारल्याचे तपासात कबुल केले आहे. प्रस्तुत प्रकरण प्रथम श्रेणी न्यायदंडधिकारी यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.

पांढरकवडा वनविभागातील मारेगाव वनक्षेत्रात दिनांक २३.०३.२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यु प्रकरणामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी न्यायालयाकडून आरोपींना जामिनावर सोडण्यात आले असून पुढील न्यायीक कार्यवाही सुरु आहे.

पांढरकवडा वनविभागातील मुकुटबन वनक्षेत्रात दिनांक २५.०४.२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यु प्रकरणामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच दिनांक १९.०६.२०२१ रोजी पोलीस विभागाच्या मदतीने ५ संशयीत आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी न्यायालयाकडून आरोपींना जामिनावर सोडण्यात आले असून पुढील न्यायीक कार्यवाही सुरु आहे.

(३) सन २०१९ मध्ये ३ प्रकरणामध्ये ५ वाघांचा मृत्यु हा शिकारीमुळे व १२ वाघांचा विविध कारणांमुळे मृत्यु झाला आहे. उपरेक्त तिन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे.

सन २०१९ मध्ये नैसर्गिक कारणामुळे-६७, अपघातात-३५ शिकारीमुळे-८ असे एकूण ११० बिबट्यांचा मृत्यु झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहे.

शिकारीमुळे मृत्यु झालेल्या बिबट्यांच्या ८ प्रकरणांपैकी ३ प्रकणे न्यायप्रविष्ठ करण्यात आली असून उर्वरित ५ प्रकरणांमध्ये आरोपींचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रत्येक वन्यजीव मृत्यु / शिकारीच्या प्रकरणांमध्ये गुन्हा नोंद करुन नियमातील तरतूदीनुसार सक्षम अधिकाऱ्यांमार्फत तपास केला जातो. वन्यजीवांची शिकारीकरीता स्थानिक शिकाऱ्यांना हाताशी धरुन आंतरराष्ट्रीय टोळ्यांचाच सहभाग असल्याचे आढळून आलेले नाही. वन्यजीव अवयवांच्या अवैध व्यापार संबंधी तक्रार प्रकरणात वाईल्ड लाईफ कंट्रोल ब्युरो, सी.बी.आय.,कस्टम, पोलीस इत्यादी यंत्रणाची मदत घेण्यात येते.

(५) व (६) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयात दिनांक २१.०९.२०२१ पासून वन्यजीव गुन्हे कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सायबर सेल तयार करण्यात आला असून राज्यात शिकारीच्या घटना घडल्यास सायबर डाटाच्या (कक्षाच्या) मदतीने आरोपींचा शोध घेण्यात येतो. तसेच जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते. अवैध शिकारीचे व इतर गुन्हे शोधणे व पुढील कार्यवाही करण्याकरिता आवश्यकते नुसार पोलीस विभागाची मदत घेण्यात येते व प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात येते. या अनुषंगाने वनअधिकारी / कर्मचाऱ्यांना वेळोवेळी कायदेविषयक उजळणी प्रशिक्षण देण्यात येते.

महारेरा मार्फत जाहिर झालेल्या काळ्या यादीतील गृहप्रकल्पाची चौकशी करुन कामात विलंब करणाऱ्या विकासका विरोधात कारवाई करणेबाबत.

(४) ३२५५८ (११-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेराने) वेळेत पूर्ण न झालेल्या सन २०१७ ते २०२१ या ५ वर्षाच्या कालावधीतील सुमारे ३ हजार ३७१ गृहप्रकल्पांची दि.४ सप्टेंबर, २०२१ रोजी काळी यादी जाहीर केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन तथा महारेराने कोणत्या निकषाच्या आधारे गृहप्रकल्पाची काळी यादी जाहीर केली आहे,

(३) तसेच काळ्या यादीतील हेतुपुरस्सर प्रकल्पाचे काम न करणाऱ्या विकासकाकडून शासनाने प्रकल्प ताब्यात घेऊन स्वत: म्हाडातर्फे राबवून पूर्ण करणेबाबत अद्याप कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांचे विकासकाम मार्गी लावून रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१९-०४-२०२२) : (१) व (२) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पाची मुदत पूर्ण करण्याचा कालावधी संपूष्टात आलेला आहे, अशा प्रकल्पांची यादी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर दि.०७.१२.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत राज्यात विकासकांनी २८४९ प्रकल्प पूर्ण केले नाहीत. ज्या प्रकल्पांची मुदत संपली आहे व विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केले नाही अथवा मुदतवाढीसाठी अर्ज केला नाही अशा प्रकल्पाचीं यादी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
(३) व (४) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे अर्धन्यायिक स्वरुपाचे काम पार पाडले जाते. सदर प्रकल्प पुर्ण करण्याच्या अनुषगांने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पातील ग्राहक संयुक्तपणे कलम ७ अन्वये तक्रार दाखल करतात अशा प्रकल्पातील ग्राहकांची, विकासकाची संयुक्तपणे सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महारेरा सुनावणी दरम्यान विकासकाकडून होणाऱ्या गैरप्रकारावर आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

(५) ३२५५९ (११-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणातील (महारेरा) सुनावणी दरम्यान अनेक वेळा विकासक सुनावणी स्थगित करुन व पुढील तारखा घेण्याच्या गैरप्रकारामुळे नियमानुसार ६० दिवसात निर्णय देण्याची तरतुद असतानाही अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे महारेराकडे निर्णयासाठी प्रलंबित असल्याचा धक्कादायक प्रकार दि.१२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२१ अखेरपर्यंत महारेराकडे एकूण किती प्रकरणे सुनावणीसाठी, किती कालावधीपासून दाखल झालेली आहेत व यापैकी किती प्रकरणे वेळेत सुनावणीची कार्यवाही पूर्ण करुन व निकाली काढून अर्जदारांना न्याय दिला आहे,
(३) अद्याप, याबाबत शासनाने कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१९-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे अर्धन्यायिक स्वरूपाचे काम पार पाडले जाते.स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे फेब्रुवारी २०२२ पर्यंत १६१३० तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी १०५१७ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. ५२१२ तक्रारींवर सुनवाणी सुरू असून ४०१ तक्रारींवर तारखा देण्याची प्रक्रीया सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वाकोला नदी लगतच्या मुंबई विमानतळापासून टिचर कॉलनी वांद्रेपर्यतच्या झोपडयांचे स्थलांतरण करुन संरक्षक भिंत बांधण्याबाबत

(६) ३२६८९ (२३-११-२०२१). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाकोला नदी (मोठा नाला) लगतच्या मुंबई विमानतळापासून टिचर कॉलनी वांद्रेपर्यंतच्या झोपडयांचे स्थलांतरण करुन संरक्षण भिंत बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त, अतिरिक्त महापालिका आयुक्त, सहायक आयुक्त, आदिंकडे दिनांक १० ऑगस्ट, २०२० पासून आजतागायत सातत्याने पत्राद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात साचलेले पाणी घरात शिरुन घरांचे बांधकाम कोसळत असून, वाकोला नदीलगत असलेली एक दुमजली इमारत थेट नाल्यात कोसळून १ महिला व तीच्या ३ मुली दिनांक ४ ऑगस्ट, २०२० च्या मुसळधार पावसात वाहून गेल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याकरीता लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने मुंबई विमानतळापासून टिचर कॉलनी वांद्रेपर्यंतच्या झोपडयांचे स्थलांतरण करुन संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे असे गृह विभागाने कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) मुंबई विमानतळापासून ते हंसभुग्रा जंक्शन येथे वाकोला नाल्याचे रुंदीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले असून, सदर कामाचा कार्यादेश दिनांक १९.११.२०२० रोजी देण्यात आला आहे.

वाकोला नाल्याच्या रुंदीकरणामध्ये बाधीत होणारी घरे/ बांधकामे यांची पात्रता/अपात्रता निश्चित करुन सदर बांधकामे निष्कासित केल्यानंतर वाकोला नदीच्या रुंदीकरणाचे व संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

चोंडी (ता.लोहा, जि.नांदेड) येथील ४ हरिण १० मोरांच्या हत्येप्रकरणी चौकशीच्या मागणीसाठी एका व्यक्तीने आत्मदहन केल्याबाबत

(७) ३२९७३ (११-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोंडी (ता.लोहा, जि.नांदेड) येथील रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या माती नाला बांधकाम दरम्यान ४ हरिण व १० मोरांची हत्या करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यासाठी चोंडी येथील एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार दाखल करुनही सदर प्रकरणी दखल घेण्यात आली नसल्याने तक्रारदाराने चोंडी येथे आत्मदहन केल्याची गंभीर घटना दिनांक २९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गंभीर प्रकरणी चौकशी करुन दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (२७-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) सन २०१० मध्ये ग्रामपंचायती मार्फत करण्यात आलेल्या मातीनाला बांधकामात हरीण व मोरांची हत्या झाल्याची श्री. शिवदास संभाजी ढवळे, मु. चोंडी, ता. लोहा, जि. नांदेड यांनी उप वनसंरक्षक, नांदेड यांचेकडे दिनांक १५.०६.२०२० रोजी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रार सुमारे १० वर्षा पूर्वी झालेल्या घटनेशी संबंधित असल्यामुळे प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक नांदेड केलेल्या चौकशीमध्ये काही निष्पन्न झाले नाही. तथापि, तक्रारदार श्री. शिवदास संभाजी ढवळे यांना पुरावे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी दिनांक २८.०४.२०२१ रोजी आत्मदहन केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी दिवाणी न्यायालय लोहा जि. नांदेड येथे वन विभागातील अधिकाऱ्यांविरुध्द फिर्याद नोंदविण्यात आली होती. तथापि न्यायालयाने दिनांक २१.०६.२०२१ रोजी सदर प्रकरण खारीज केले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

दापोली, (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बुरोंडी, उंबर्ले तेरेवायंगणी पन्हाळेकाजी-दाभिळ-पांगारी येथील प्रजिमा रस्ता नादुरुस्त असल्याबाबत

(८) ३३२२२ (११-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बुरोंडी, उंबर्ले तेरेवायंगणी पन्हाळेकाजी-दाभिळ-पांगारी व आंजर्ले-कादिवली घराडी-दहागांव येथील प्रजिमा रस्ता अत्यंत नादुरुस्त झाला असल्याचे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता नादुरुस्त असल्याने या रस्त्यावरुन होणाऱ्या एसटी वाहतूकीस अडचणी निर्माण होत असल्याने एस टी वाहतूक बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी /चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार, उक्त रस्त्याचे डांबरीकरण व खडीकरण तातडीने करण्याकरिता शासनाने निधीची तरतूद केली आहे काय, असल्यास किती रकमेची तरतूद केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अशोकराव चव्हाण (०९-०५-२०२२) : (१) जुलै, २०२१ मधील अतिवृष्टीमुळे सदर रस्ते क्षतिग्रस्त झाले होते हे खरे आहे.
(२) व (३) आडे पूल पाडले आंजर्ला कांदिवली आवाशी घराडी दहागाव रस्ता रामा १३८ असून सा.बां.विभागातंर्गत येणारा दापोली तालुक्यातील संपूर्ण २९.१०० किमी लांबीचा रस्ता वाहतूकीस सुरळीत आहे व मंडणगड तालुक्यातील एकूण ११.७०० किमी लांबीपैकी १.१०० किमी इतकी लांबी चांगली असून ३०/२०० ते ४०/८०० ही लांबी खराब आहे.

बुरोंडी, उंबर्ले, तेरेवायंगणी पन्हाळेकाझी दाभिळ पांगारी रस्ता प्रजिमा ८७ वरील ६.४०० किमी लांबीचा रस्ता जुलै, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अत्यंत खराब झाला असल्याने एसटी वाहतूक तात्पुरत्या स्वरुपात बंद झालेली होती. तथापि, रस्त्यावरील खड्डे लगेचच जांभा दगडाने भरुन रस्ता एसटी वाहतुकीस सुरळीत सुरु केला आहे.
(४) व (५) मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यातील बुरोंडी उंबर्ले तेरेवायंगणी पन्हाळेकाजी दाभीळ पांगारी रस्ता प्रजिमा ८७ किमी ९/००० ते ११/०००, १२/००० ते १४/९००, १५/९०० ते १७/००० मध्ये सुधारणा व डांबरीकरणासाठी रु.२६१.२५ लक्ष व मंडणगड तालुक्यातील आंजर्ला कादीवली घराडी दहगाव रस्ता रामा १३८ किमी ३०/२०० ते ३३/६०० व ३३/६०० ते ४०/८०० मध्ये सुधारणा व डांबरीकरणासाठी रु.३८०.०० लक्ष रक्कमेस मंजूरी देण्यात आली असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे कार्यान्वयीत करण्याचे नियोजन आहे.

दापोली तालुक्यातील बुरोंडी उंबर्ले तेरेवायंगणी पन्हाळेकाजी दाभीळ पांगारी रस्ता प्रजिमा ८७ या रस्त्यांच्या किमी १७/४०० ते २६/४०० या लांबीमध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून काम प्रगतीत आहे.

मंडणगड तालुक्यातील आंजर्ला कादीवली घराडी दहगाव रस्ता रामा १३८ किमी ४/४०० ते ११/८०० या लांबीमध्ये रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत रक्कम रु.२४६.८० लक्ष इतक्या रक्कमेचे काम मंजूर असून दि.२५/०३/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदरचे काम १२ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील के.ई.एम. रुग्णालयात शासकीय औषध विक्री केंद्रांमध्ये सर्व प्रकारच्या औषधांचा पुरवठा करण्याबाबत

(९) ३३२७५ (२५-११-२०२१). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील परेल येथील के.ई.एम. रुग्णालयात उपचाराकरिता महाराष्ट्रात विविध ठिकाणाहून

येणारे रुग्ण यांना वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून औषधांची चिठ्ठी देण्यात येत असून सदर औषधे रुग्णालयातच मिळणे अपेक्षित असताना ती मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी लिहून दिलेली औषधे रुग्णालयाच्या औषध विक्री केंद्रात अनेक वेळा उपलब्धच नसल्याने रुग्णांच्या नातेवाईकांकडून याबाबत केईएम रुग्णालयाकडे अनेक तक्रारी दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाहेरील मेडिकल मध्ये मिळणारी महागडी औषधे परवडत नसल्याने अनेक रुग्णांचे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या असल्याचे समोर आले असून, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहरामध्ये महापालिकेच्या के.ई.एम. सारख्या रुग्णालयातील शासकीय औषध विक्री केंद्रांमध्ये सर्व प्रकारच्या औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२९-०४-२०२२) : (१) व (२) मुंबईतील परेल येथील के.ई.एम. रुग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांना औषध अनुसूचीवर असलेली औषधे वेळोवेळी उपलब्ध करुन दिली जातात. औषध अनुसूचीवर नसलेली व वेळोवेळी रुग्णांना आवश्यक असलेली औषधे स्थानिक पातळीवर किंवा ई-दरपत्रिका काढून खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन दिली जातात.

तसेच बाह्य रुग्ण विभाग व वॉर्डमधील रुग्णांना काही विशिष्ट आजारांकरिता लागणारी महागडी औषधे के.ई.एम. रुग्णालयातील समाजसेवकांमार्फत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन दिली जातात.

दारिद्र्य रेषेखालील गरीब आणि दुर्बल घटकातील रुग्णांना अनअनुसूचित तात्काळ लागणारी औषधे गिफ्ट शॉपमधून गरीब रुग्ण धर्मादाय निधीमधून उपलब्ध करुन दिली जातात.

रुग्णांना लागणारी औषधे के.ई.एम. रुग्णालयामार्फत वेळोवेळी उपलब्ध करुन दिली जात असल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून औषधांची चिठ्ठी गरीब रुग्णांना लिहून दिली जात नाही व अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या नाहीत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बाहेरील मेडिकलमध्ये मिळणारी महागडी औषधे परवडत नसल्याने औषधांअभावी मृत्यू झाल्याच्या घटना के.ई.एम. रुग्णालयामध्ये झालेली नाही, त्यामुळे चौकशी करण्यात आली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गरीब रुग्ण धर्मादाय निधीमधून रुग्णांना औषधे उपलब्ध करुन दिली जातात. तसेच शासनामार्फत जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना व प्रधानमंत्री जीवनदायी आरोग्य योजना राबविण्यात येत असून, सदर योजनेमार्फत रुग्णांवर उपचार करण्यात येतात व औषधे उपलब्ध करुन दिली जातात असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेतर्फे मिरा-भाईंदर महानगरपालिकेला प्रतिदिन मंजूर झालेला १.५ द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत

(१०) ३३५२१ (०२-०२-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरारोड (जि.ठाणे) येथे म्हाडा मार्फत शासनाने घरकुल प्रकल्प निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरकुल प्रकल्पांकरीता मुंबई महानगरपालिकेतर्फे मिरा-भाईंदर महानगरपालिकेला प्रतिदिन १.५ द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सदरच्या पाण्यासाठी मुंबई महानगरपालिकेस रीतसर सुरक्षा अनामत रक्कम आणि क्रॉस कनेक्शन शुल्क भरणा व इतर आवश्यक त्या कामाकरीता लागणारे शुल्क अदा केले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेकडून मिरा-भाईंदर शहरासाठी मंजूर करण्यात आलेला प्रतिदिन १.५ द.ल.ली. पाणी पुरवठा अद्याप सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर पाणी पुरवठा सुरु करण्यायाकरीता लोकप्रतिनिधींनी दिनांक ०२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास नगरविकास मंत्री आणि पाणीपुरवठा स्वच्छता मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) म्हाडाने उभारलेल्या घरकुलांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यासाठी दहीसर चेक नाका येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेने १.५ द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध करून देण्याचे दि.२२.०१.२०१४ रोजी मान्य केले, ही वस्तुस्थिती आहे.

(३) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दहिसर चेक नाका ते म्हाडा संकुलापर्यंत जलवाहिनी अंथरण्याचे कामे दि.१२.०५.२०१५ रोजी केलेली आहेत. सदर जलजोडणीसाठीची आवश्यक अनामत रक्कम रू.२२,२०,०००/- चा भरणा व क्रॉस कनेक्शन शुल्क रक्कमेचा भरणा केला असून इतर साहित्यासाठी लागणारे शुल्क रू.४,००,३४०/- अदा करण्यात आलेले आहेत.

(४), (५) व (६) मिरा-भाईंदर महानगरपालिकेसाठी प्रस्तावित पाणीपुरवठा हा बोरीवली येथील जलाशयातून करण्याचे प्रस्तावित आहे.

बोरीवली जलाशयाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीला सन २०१७ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये मोठ्या प्रमाणात हानी झाल्याने, बोरीवली जलाशयाला मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा झालेला नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर, आर/उत्तर, आर/मध्य व आर/दक्षिण प्रभागांमध्ये अनेक ठिकाणी कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे.

सदर प्रभागांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरीता जल विभागामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

बोरीवली जलाशयाला पाणीपुरवठा करणाऱ्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील जलवाहिनीचे काम झाल्यानंतर व बोरीवली जलाशयाला अतिरिक्त पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेला मंजूर केलेला १.५ द.ल.ली. प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे वन विभागाअंतर्गत (ता.मुरबाड, जि.ठाणे) मिंडा साई प्रा.ली.धानिवली यांनी महाराष्ट्र शासन राखीव वनेच्या क्षेत्रांमध्ये बेकायदेशीर बांधकामे केल्याबाबत

(११) ३३५३८ (११-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे वन विभागाअंतर्गत मुरबाड तालुक्यातील मिंडा साई प्रा.ली.धानिवली यांनी मौजे धानिवली येथील मा.ग.नं.२४८, २५०, २५१, व २५२ या महाराष्ट्र शासन राखीव वने च्या क्षेत्रांमध्ये विविध प्रकारची बेकायदेशीर बांधकामे केल्याने दि.१० मार्च, २०१५ रोजी वन विभागाने नोटीस देवून सदरची बांधकामे हटविण्याबाबत कळविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरची बेकायदेशीर बांधकामे हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

मौजे धानिवली येथील मे.मिंडा साई प्रा.लि. धानिवली यांनी मौजे धानिवली येथील मा.ग.नं. २४८, २५०, २५१ व २५२ (जूना सर्वे क्र. ६३) च्या खाजगी वन क्षेत्रामध्ये विविध प्रकारची बेकायदेशीर बांधकाम केल्याचे आढळून आल्यानंतर सदरची बांधकामे हटविण्याबाबत वन विभागामार्फत मार्च, २०१५ मध्ये नोटीस देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रकरणी प्रश्नांकित जागेच्या पहाणीअंती सदर कंपनीने रस्ता, गोडाऊन, ऑफीस, पार्किंग व इतर बांधकामे केल्याचे आढळून आल्याने वनक्षेत्रपाल, मुरबाड (पश्चिम) यांनी सदर कंपनीच्या व्यवस्थापकांना दिनांक ३१.१.२०२२ रोजी पुन्हा नोटीस दिली आले. तसेच उप वनसंरक्षक, ठाणे यांच्या कार्यालयाकडून दिनांक २.२.२०२२ रोजी सहाय्यक वनसंरक्षक (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन), मुरबाड व ठाणे यांना सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.

नवापूर (जि.नंदूरबार) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक - ६ बेकडी ते फागणे पर्यंतच्या रस्त्याबाबत

(१२) ३३७७६ (११-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्याच्या बेडकी पासून फागणे पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग क्र.-६ च्या रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरील नवापूर ते कोंडाईबारी घाटातील पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे या रस्त्यावर लहान-मोठे किती अपघात झाले आहेत,

(३) असल्यास, अपघातात मरण पावलेल्या व जखमी झालेल्या लोकांची संख्या किती आहे,

(४) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे काम जलद गतीने व दर्जेदार होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. अशोकराव चव्हाण (११-०५-२०२२) : (१) नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्याच्या बेडकी पासून फागणे पर्यंतच्या १४० कि.मी.चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीतील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर चौपदरीकरणाचे काम नोव्हेंबर, २०१६ मध्ये हाती घेण्यात आले होते. तथापि कंत्राटदाराच्या आर्थिक समस्यांमुळे सदर काम ऑक्टोबर, २०१८ पासून बंद पडल्याने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून सदर कामाचा करार ऑगस्ट, २०१९ मध्ये संपुष्टात आणण्यात आला. त्यानंतर उर्वरीत कामासाठी नव्याने निवीदा निश्चीत होऊन सप्टेंबर, २०२० मध्ये काम सुरु करण्यात आले असून सदर काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच प्रस्तुत कामाचा दर्जा राखण्याच्या दृष्टीने कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी स्वतंत्र अभियंत्याची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेमार्फत आवश्यकतेनुसार करण्यात येत असलेल्या सूचनांच्या अनुषंगाने करारनाम्यानुसार काम करण्यात येत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.

(२) सदर महामार्गावरील कोंडाईबारी घाटातील पूलाचे काम पर्यवेक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्वतंत्र अभियंता यांचे देखरेखीखाली करारनाम्यानुसार करण्यात आले आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.

बेडकीनाका ते कोंडाईबारी घाटापर्यंत जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीत एकूण ५५ अपघात झाले असल्याचे पोलीस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी कळविले आहे.

(३) सदर अपघातांमध्ये मरण पावलेल्या लोकांची संख्या २७ असून जखमी झालेल्या लोकांची संख्या ३४ आहे, असे पोलीस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी कळविले आहे.

(४) व (५) अनु.क्र.१ च्या उत्तरामध्ये नमूद केल्यानुसार.

___

मुंबईतील गोरेगाव येथील आरे मधील ८०० एकर जमीन जंगल म्हणून आरक्षित करण्याबाबत

(१३) ३३८४० (११-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव येथील आरे मधील ८०० एकर जमीन जंगल म्हणून आरक्षित करण्याचा निर्णय सरकारने गत वर्षी घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयानंतरही वर्षभरात जंगल आरक्षित करण्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही घेतलेला निर्णय अंमलात न आणण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, तातडीने जंगल आरक्षित करण्याकरीता शासनाने काय कोणती कार्यवाही वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

मौजे मरोळ, मरोशी, आरे, गोरेगाव, तालुका बोरीवली मधील ३२७.२०१ हे.आर क्षेत्र (८०८.५३१२ एकर) भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अन्वये "राखीव वन" म्हणून घोषीत करण्याबाबत दिनांक १२.१०.२०२० रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) मौजे मरोळ-मरोशी येथील ४०.४६९ हे.आर क्षेत्र दिनांक २४.७.२०१३ व मौजे आरे-गोरेगाव येथील २८६.७३२ हे.आर क्षेत्र दिनांक ७.६.२०२१ रोजी दुग्ध व्यवसाय विभागाकडून वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी ताब्यात घेतले आहे.

उपरोक्त ताब्यात घेण्यात आलेल्या क्षेत्राची मोजणी करुन हद्द निश्चिती करण्यासाठी नगर भूमापन विभागाकडे शासकीय दराने रक्कम भरणा करण्यात आली असून सद्यस्थितीत मौजे मरोळ-मरोशी व गोरेगाव येथील क्षेत्राची मोजणी झाली असून मौजे आरे येथील क्षेत्राच्या मोजणीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर जमिनीवरील अधिकारांचे अस्तित्व, स्वरुप व व्याप्ती निर्धारित करण्याकरिता भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ खंड (क) अन्वये वन जमाबंदी अधिकारी म्हणून उप विभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वनजमाबंदी चौकशीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदर क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २० अन्वये अंतिमत: राखीव वन म्हणून अधिसूचित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महारेराकडे नोंदणी असलेले गृह प्रकल्प विकासकांनी अपूर्णावस्थेत ठेवले असल्याबाबत

(१४) ३४१५४ (११-०१-२०२२). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महारेराकडे नोंदणी असलेले साधारण तीन हजार गृह प्रकल्प विकसकांनी अपूर्णावस्थेत ठेवले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेरा कायद्याची अंमलबजावणी सन २०१७ मध्ये सुरू झाल्यापासून प्रकल्प पूर्ण न करणाऱ्या विकासकांची एकूण संख्या किती आहे,

(३) असल्यास, रेरा कायद्यानुसार नोंदणी करण्यात आलेले प्रकल्प विहीत मुदतीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१९-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पाची मुदत पूर्ण करण्याचा कालावधी संपूष्टात आलेला आहे, अशा प्रकल्पांची यादी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येते.

सद्यस्थितीत राज्यात विकासकांनी २८४९ प्रकल्प पूर्ण केले नाहीत.

(३) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे अर्धन्यायिक स्वरुपाचे काम पार पाडले जाते. सदर प्रकल्प पुर्ण करण्याच्या अनुषगांने स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार ज्या प्रकल्पातील ग्राहक संयुक्तपणे कलम ७ अन्वये तक्रार दाखल करतात अशा प्रकल्पातील ग्राहकांची, विकासकाची संयुक्तपणे सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महामार्ग व रस्त्यांवरील अपघात व मृत्यूचे प्रमाण वाढले असल्याबाबत

(१५) ३४४४९ (११-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महामार्ग व रस्त्यांवरील वाहतुकीचे प्रमाण वाढले असून त्यामुळे खड्डेमय रस्त्यांमुळे अपघात होऊन अनेक प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वाढते अपघात व मृत्यूचे प्रमाण लक्षात घेता शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणती उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०९-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
अशी घटना निदर्शनास आलेली नाही. रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरुन रस्ते वाहतुकीकरीता स्थितीत ठेवण्यात आले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगाव (पूर्व) (मुंबई) आरे वसाहतीमधील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालयात अतिरिक्त कर्मचारी कार्यरत असल्याबाबत

(१६) ३५४२० (११-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (पूर्व) (मुंबई) येथील आरे वसाहतीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय स्थापित करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात एकूण किती कर्मचारी वृंद कार्यरत आहेत, त्याचा पदनिहाय तपशील काय आहे व त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या कामकाजाचा तपशील काय आहे,
(३) तसेच सदरहू कर्मचारी वर्गाकडून गत पाच वर्षात कोणकोणती कामे या परिसरात करण्यात आली आहेत व एकूण किती खर्च करण्यात आला असून त्याचा प्रकल्पपनिहाय तपशील काय आहे,
(४) गोरेगाव (पूर्व) (मुंबई) येथील आरे वसाहतीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दरवर्षी किती निधी देण्यात येतो व सदरहू निधीचा व्यय कर्मचाऱ्यांचे वेतन, दुरूस्तीची कामे, इ. कारणासाठी किती प्रमाणात व कशाप्रकारे करण्यात येतो याचा गत पाच वर्षातील सविस्तर तपशील काय आहे,
(५) स्थानिक कार्यालयाकडे विचारणा केली असता सद्य:स्थितीत या ठिकाणी नियुक्त असलेले सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचारी हे अन्य प्रकल्पावर काम करीत असल्याचे सांगण्यात येते, त्यानुषंगाने सदरहू कर्मचारी कोणत्या प्रकल्पावर केव्हापासून व कोणते काम करीत असून सदरहू प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे व सदरहू प्रकल्प आणखी किती कालावधीकरिता सुरू राहणार आहे याचा सविस्तर तपशील काय आहे,
(६) जर सदरहू कर्मचारी अशा कोणत्याच प्रकल्पावर काम करीत नसल्यास या ठिकाणी असलेले कामाचे स्वरूप पाहता या ठिकाणी असलेला कर्मचारी वर्ग व त्यांचेमार्फत करण्यात आलेल्या कामाची तपासणी (ऑडीट) करून सदरहू ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी वर्ग असल्यास सदरहू कर्मचारी अन्य गरजेच्या ठिकाणी नियुक्त करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही किती कालावधीत करणार असून याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री. अशोकराव चव्हाण (२४-०२-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) सदरहू विभाग तसेच या विभागांतर्गत असलेल्या उप विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा पदनिहाय तपशिल विवरणपत्र “अ” व “ब” मध्ये जोडण्यात आला आहे. आरे विभागांतर्गत मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आलेल्या अतिरिक्त कार्यभाराचा तपशिल विवरणपत्र “ब-१” मध्ये जोडण्यात आला आहे.

(३) व (४) सदरहू कर्मचारी वर्गाकडून गत पाच वर्षात करण्यात आलेल्या प्रकल्पनिहाय कामाचा तपशील सोबत विवरणपत्र "क" मध्ये जोडण्यात आला आहे.
तसेच सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी गत पाच वर्षात करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील सोबत विवरणपत्र "ड" मध्ये जोडण्यात आला आहे.
(५) सद्य:स्थितीत या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या काही अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वरळी तसेच उप अभियंता, सा.बां.उपविभाग, चेंबुर मुख्यालय, कुर्ला, कमानी येथील कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच काही अधिकारी /कर्मचारी यांच्याकडे, भारत सरकार टांकसाळ, मुंबई येथील ए.डी.एच व पॉलिक्लिनिक इमारत दुरुस्ती, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील संरक्षक भिंत बांधणे, मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्याची इमारत बांधणे इ.कामे सोपविण्यात आली आहेत. याबाबतचा तपशिल विवरणपत्र "ब" मध्ये जोडण्यात आला आहे.
(६) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध मंजूर करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे. सदर आढाव्याअंती याबाबत कार्यवाही करण्यात येईल. **(प्रपत्र ब-१, ड, व प्रपत्र ब यादीच्या शेवटी जोडण्यात आले आहे.)**

मे. सी.आर. कन्स्ट्रक्शन कंपनी च्या कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत

(१७) ३५५७४ (११-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ अकोला (जिल्हा अकोला) यांनी पत्र क्र.अर्थ/का-५/२०१८-१९/ ४३२ दिनांक २७/७/२०१८ अन्वये मे. सी.आर. कन्स्ट्रक्शन कंपनी या कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांना पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) उक्त, कंत्राटदाराकडून अकोला शहरातील महानगर पालिका हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ च्या अधोन्न्नत भाग कि.मी. २४७/४००, २४८/७०० व २४९/४०० मध्ये जंक्शनचा कामाचा दोष दायित्व कालावधी शेष असतांना कंत्राटदाराने दुरुस्ती केली नाही, हे खरे आहे काय,
(३) उक्त, कंत्राटदाराने दोष दायित्व निवारण कालावधीत रस्ता दुरुस्ती पुन:स्थापनेचे काम आदेश देऊनही, काम केले नसल्याकारणाने कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी उक्त कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्यात आले काय,
(५) नसल्यास, काळ्या यादीत न टाकण्याची कारणे काय?

श्री. अशोकराव चव्हाण (१३-०५-२०२२) : (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३), (४) व (५) शासन निर्णय क्र. संकीर्ण ०५/०६/प्र.क्र.५३/इमा-२ दि. २८ सप्टेंबर, २००६ नुसार कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याच्या कार्यपद्धतीबाबत विषद मार्गदर्शक सुचनांमधील परि. ३.१ नुसार संबंधीत कंत्राटदारास ताकीद देण्यात आली आहे.

पेण (जि.रायगड) तालुक्यातील खाडी किनाऱ्याची कामे निधी मंजूर करून त्वरीत पुर्ण करण्याबाबत

(१८) ३५७५१ (०७-०१-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील दादर (दक्षिण) स्मशानभुमी रोड, दादर, रावे, खांब-उर्णोली, शिर्की चाळ, भाल, बहिरम कोटक, कणे, रावे मोराकोटा खाडी, रावे खाडीलगत सागरवाडी, ओढांगी या सर्व ठिकाणी संरक्षित भिंत व बंधारे बांधणे अत्यावश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन मा.बंदरे मंत्री यांचेकडे दिनांक २१ ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामांना निधी उपलब्ध करून मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (१९-०४-२०२२) : (१) व (२) होय.
(३) पेण (जि.रायगड) तालुक्यातील दादरगांव वशेणी हायवे ते रामआळी येथे धूपप्रतिबंधक बंधारा बाधणेचे रु.२.४७कोटी अंदाजित किंमतीचे काम सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ३९ वन ग्राम बंदीभाग म्हणून ओळखला जात असून या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत

(१९) ३६०३७ (११-०१-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील ३९ वन ग्राम भाग बंदीभाग म्हणून ओळखला जात असून या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत हिवाळी अधिवेशन, २०१९ मध्ये मा. मुख्यमंत्री यांनी निधी मंजूर करुन देण्याचे आश्वासन देऊन अद्यापही निधी मंजूर करण्यात आला नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या सुमारास मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या दालनात बैठक आयोजित करण्याचे निवेदन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निधी मंजूर केला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (१०-०३-२०२२) : (१) मा.मुख्यमंत्री यांनी यवतमाळ जिल्ह्याच्या दि.१६.१२.२०१९ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत सदर रस्त्यांकरीता आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत निर्देश दिले आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे बैठक आयोजित करणेबाबत निवेदन प्राप्त नाही.
(२) व (३) निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार कामे मंजुर करून हाती घेण्याचे नियोजन आहे.

उमरखेड व महागांव (जि.यवतमाळ) तालुक्याकरिता जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय (व.स्त.) स्थापन करण्याबाबत

(२०) ३६०४१ (१७-०१-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड व महागांव (जि.यवतमाळ) तालुक्याकरिता जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय (व.स्त.) स्थापन करण्याबाबतचा स्वयंस्पष्ट व परिपूर्ण अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या सुमारास विधी व न्याय विभाग यांनी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ यांना दिला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१५-०३-२०२२) : (१) मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून उमरखेड, जिल्हा यवतमाळ येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याबाबत व त्यासाठी पद निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती शासनपत्र, विधि व न्याय विभाग दिनांक ०३.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यवतमाळ यांचेकडून मागविण्यात आली होती.

(२) दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय यवतमाळ यांनी माहिती ई मेलद्वारे शासनास सादर केली आहे.

(३) प्रस्तावाची तपासणी शासन स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील मा. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना अनुदान प्राप्त झाले नसल्याबाबत

(२१) ३६१६३ (११-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील मा. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सन २०१९ मध्ये ४१०० पेक्षा जास्त घरकुल लाभार्थ्यांची निवड होवूनही अद्याप अनुदान प्राप्त झाले नसल्याने लाभार्थ्यांना घरकूलाचा लाभ मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर घरकुल लाभार्थ्यांना त्वरीत लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-०३-२०२२) : (१) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सन २०१९ पर्यंत नागपूर जिल्हयातील ४७२६१ मंजूर घरकुलांना राज्य हिश्श्यापोटी रुपये २७.२५६ कोटी व केंद्र हिश्श्यापोटी रुपये १२.४२३ कोटी असा एकूण रुपये ३९.६७९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. फेब्रुवारी २०२२ पर्यंत नागपूर जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ५८४३८ घरकुले मंजूर करण्यात आलेली आहेत.
(२) नागपूर जिल्हयातील आजतागत मंजूर ५८४३८ घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची (CSMC) मंजुरी मिळालेली असून, यापैकी प्रगती पथावर असलेल्या मंजुर घरकुलांना राज्य हिश्श्यापोटी रुपये २८४.४५४० कोटी व केंद्र हिश्श्यापोटी रुपये २१७.७१३५ कोटी असा एकूण रुपये ५०२.१६७५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच केंद्र शासनाकडून प्रकल्प निहाय केंद्र शासनाच्या हिस्सापोटीचा निधी वितरीत करण्यात येतो. याशिवाय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र लाभार्थ्यांना राज्य हिश्श्यापोटीचा रुपये १ लक्ष प्रती लाभार्थी इतका निधी दिनांक १ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सरसकट महाराष्ट्र निवारा निधीतून वितरीत करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाली (ता.सुधागड, जि.रायगड) शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यास होत असलेला विलंब

(२२) ३६२१६ (१२-०१-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) हे शहर “ब” वर्ग दर्जाचे तिर्थ क्षेत्र असून शहरास केमिकलमिश्रीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाली शहराकरीता शुध्द पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी स्थानिकांच्या मागणीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे योजना मंजूर केली आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, सदर योजनेचे प्रत्यक्षात काम सुरू होण्यास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०२२) : (१) पाली शहरास रसायनमिश्रीत पाणीपुरवठा होत नसल्याची वस्तूस्थिती नगरपंचायतीने कळविली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

(४) सद्यस्थितीत असलेली पाणी पुरवठा योजना तत्कालिन ग्रामपंचायत काळापासून कार्यान्वित असून त्याचे संचलन व नियंत्रण हे त्यांचेमार्फत करण्यात येत होते.

स्थानिक नागरीकांची मागणी व पाली हे अष्टविनायक गणपती क्षेत्रापैकी एक असल्याने येणाऱ्या भाविकास व गावातील नागरीकांना नियमित पुरेसा पाणीपुरवठा व्हावा, यासाठी सुधारीत पाणी पुरवठा योजना हाती घेण्याबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ माणगांव, जि.रायगड यांना तत्कालिन ग्रामपंचायतीने विनंती केली होती, अशी वस्तुस्थिती नगरपंचायतीने कळविली आहे.

पाली ही नवनिर्मित नगरपंचायत असून सध्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या योजनेमधून शहरास नियमित व सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच भविष्यातील वाढीव पाण्याची मागणी विचारात घेऊन पाली शहराकरीता सुधारीत पाणी पुरवठा योजना मंजूर करुन घेण्याचे नियोजन असल्याचे पाली नगरपंचायतीने कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात वाघाच्या हल्यात ठार झालेल्या मृतकांच्या परिवारातील सदस्याला शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

(२३) ३६२२६ (११-०१-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात वाघाचा धुमाकूळ सुरु असून आतापर्यंत १७ निष्पाप लोकांचा वाघाने बळी घेतलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात मृत्यू पावलेले लोक शेतकरी, शेतमजूर, घरातील कर्ता पुरुष असून कोणाला शेतावर तर कोणाला शेतीवर जाताना वाटेतील जंगली भागात वाघाने हल्ला करून ठार केलेले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, घरातील कर्ता पुरुष ठार झाल्याने परिवार निराधार होत असून त्या परिवारावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास अशा परिवाराला शासनाकडून १५ लक्ष रुपयांची मदत दिली जात असून केवळ ५ लक्ष रुपये नगद व उर्वरित बँकेत जमा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) मात्र अशा निराधार परिवाराला आधाराची नितांत आवश्यकता असून मृतकाच्या परिवाराला किंमान २५ लक्ष रुपये व एका सदस्याला शासकीय नोकरी दिल्यास त्यांना आधार मिळेल हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२७-०४-२०२२) : (१), (२) व (३) वनात गुरे चरतांना, वनोपज वेचताना तसेच शेतात ये-जा करताना जानेवारी, २०२० ते डिसेंबर, २०२१ या कालावधीत गडचिरोली वनवृत्तामधील वडसा वनविभागामध्ये १०, गडचिरोली वन विभागामध्ये ३ तसेच महाराष्ट्र वनविकास महामंडळ, ब्रम्हपूरी येथे ६ असे एकूण १९ व्यक्तींचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यु झाला असून त्यामध्ये १० पुरुषांचा व ९ महिलांचा समावेश आहे.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कादेशीर वारसास रु. ५.०० लक्ष धनादेशाने तात्काळ देण्यात येतात व रु. ५.०० लक्ष ५ वर्षांकरीता तर रु. ५.०० लक्ष १० वर्षांकरीता मुदत बंद ठेवीत ठेवण्यात येऊन एकूण रु. १५.०० लक्ष अदा करण्यात येतात. तथापि, मृत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यास शासकीय नोकरी देण्याची तरतूद नाही.
(६) प्रश्न उदभवत नाही.

डहाणू शहर, कासा, बोर्डी (ता.डहाणू, जि.पालघर) या भागात असलेल्या शासकीय विश्रामगृहांच्या दुरावस्थेबाबत

(२४) ३६५९० (१७-०१-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू शहर, कासा, बोर्डी (ता.डहाणू, जि.पालघर) या भागात असलेल्या शासकीय विश्रामगृहांची गेल्या अनेक वर्षांपासून दुरुस्ती न झाल्याने दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विश्रामगृहाच्या दुरुस्तीसाठी अनेकदा प्रस्ताव पाठवूनही वरिष्ठ अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विश्रामगृहाची दुरुस्ती तात्काळ करण्याच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे व दुरुस्तीच्या प्रस्तावाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिका-यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
डहाणू व कासा येथे शासकीय विश्रामगृह असून बोर्डी येथे शासकीय इमारत विश्रामगृह नसून सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या अखत्यारीतील शासकीय भांडारगृह आहे. सदर शासकीय विश्रामगृह व भांडारगृह यांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती केली जाते.
(२) व (३) हे खरे नाही,
(अ) डहाणू येथील शासकीय विश्रामगृहाची आवश्यक दुरुस्ती करण्यात आली असून उर्वरीत कामे प्रगतीत आहे.
(ब) कासा येथील विश्रामगृहांच्या आवश्यक त्या दुरुस्ती कामांना मान्यता प्राप्त असून त्यास अनुसरुन पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(क) बोर्डी येथील शासकीय भांडारगृहाच्या आवश्यक दुरुस्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयातील तळेगांव दाभाडे नगरपरिषद हद्दीच्या तळयातील माती व मुरुमाचे गौण खनिजाचे बेकायदा खोदकाम करुन केलेला गैरव्यवहार

(२५) ३७६४० (११-०१-२०२२). श्री.सुनिल शेळके (मावळ) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगांव दाभाडे (जि.पुणे) येथील नगरपरिषद हद्दीच्या तळयातील माती व मुरुम या गौण खनिजाचे बेकायदा खोदकाम करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद प्रशासनाने सदर तळयातील गौण खनिजांची परस्पर विक्री करुन शासनास स्वामित्व धन (रॉयल्टी) जमा न केल्यामुळे, शासन महसूलाचा गैरवापर केल्याप्रकरणी तहसिलदार यांनी तळेगांव दाभाडे नगरपरिषदेस रुपये ७९ कोटी ६४ लाख ९४ हजार ६०० इतक्या रकमेचा दंड ठोठावला असल्याचे दिनांक ८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करुन संबंधित पदाधिकारी, अधिकारी व संबंधित ठेकेदारांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यात यावा अशी आग्रही मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने मा.जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी केलेल्या चौकशीत दोषारोप निश्चित करुन प्रथमदर्शनी दोषी ठरत असलेल्या नगरपरिषद पदाधिकाऱ्यांबाबत अपात्रता व मुख्याधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचा अहवाल मा.विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर करुन सदर प्रकरण शासनाकडे पुढील कारवाईसाठी सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर बाबत शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०२२) : (१) होय,

(२) होय, तथापि, सदर दंडाबाबत नगरपरिषदेने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले आहे.

(३) नाही,

(४) होय, या प्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अहवालाच्या अनुषंगाने, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय यांनी अहवाल शासनास सादर केला आहे.

(५) या प्रकरणी संचालनालयाने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे तसेच, सादर केलेल्या प्रारुप दोषारोपांच्या अनुषंगाने, संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द त्यांच्या जबाबदारीच्या अनुषंगाने या प्रकरणी दोषारोप अंतिम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच, संबंधित नगराध्यक्ष व सदस्य/सदस्या यांचेविरुध्द महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ५५ व कलम ४२ अन्वये अपात्रतेची कार्यवाही सुरु करण्यात आली असून, संबंधित सदस्यांविरुध्द कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रातील कांदळवन क्षेत्र संवर्धनासाठी कांदळवन कक्षाची निर्मिती करण्याबाबत

(२६) ३८०१३ (३०-०३-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईंदर महापालिकेच्या क्षेत्रातील कांदळवन क्षेत्र संरक्षणाच्यादृष्टीने अत्यंत संवेदनशील असल्याने त्यांचे व्यवस्थापन, संरक्षण आणि संवर्धनासाठी कांदळवन कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारफूटीच्या संरक्षणासाठी असलेल्या कार्यपध्दतीमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राज्याच्या महसूल व वन विभागाने मुंबई कांदळवन कक्षाचे ५ वन परिक्षेत्र, ११ परिमंडळे आणि २७ नियतक्षेत्रे निर्मितीसाठी शासनाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशातील खारफूटीच्या जंगलाने शहराला महापूराच्या धोक्यापासून सन २००५ मध्ये वाचविल्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार करण्यात आलेल्या पुनर्रचना आराखडयाचे एकुण स्वरुप काय असून शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१८-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) वन विभाग, शासन निर्णय दिनांक ३०.१२.२०२१ अन्वये मुंबई कांदळवन संधारण घटक अंतर्गत ५ वनपरिक्षेत्र, ११ परिमंडळ, २७ नियत क्षेत्र निर्मितीस मान्यता देण्यात आली असून मुंबई कांदळवन संधारण घटकांतर्गत वनपरिक्षेत्र निहाय ४९ क्षेत्रीय पदांची पुनर्रचना करण्यात आली आहे. त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे:

वन परिक्षेत्र	पदनाम				एकूण पदे
	वन परिक्षेत्र अधिकारी	वनपाल	वनरक्षक	विशेष सेवा वनरक्षक	
ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य	१	३	६	१	११
पश्चिम मुंबई	१	२	५	१	९
मध्य मुंबई	१	२	४	१	८
नवी मुंबई	१	२	६	१	१०
ठाणे (कांदळवन)	१	२	६	१	१०
विभागीय कार्यालय	-	-	-	१	१
एकूण	५	११	२७	६	४९

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तेंदु हंगाम-२०२० चे प्रोत्साहनात्मक बोनसचे दर जाहीर करण्याबाबत

(२७) ३८२५८ (२८-०३-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेंदु हंगाम-२०२० मध्ये तेंदुपत्ता संकलन करणा-या लाभार्थ्यांना विभागीय कार्यालयांकडून प्रोत्साहनात्मक बोनस मंजूर तसेच बोनसचे दर जाहीर न केल्याने प्रोत्साहनात्मक बोनस मंजूर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०५-२०२२) : (१) व (२) शासन निर्णय क्रमांक: एमएफपी-२१-०४/प्र.क्र.६७/फ-१, दिनांक २८.०२.२००६ व दिनांक ०१.११.२००७ नुसार तेंदु हंगामामध्ये प्राप्त स्वामित्व शुल्कातुन मागिल आर्थिक वर्षात तेंदुपान संकलनाकरीता तेंदु लेखाशिर्षांतर्गत झालेला खर्च (अधिक १२ टक्के या प्रमाणे) वजा जाता उर्वरीत निव्वळ नफा तेंदू पाने संकलन करणाऱ्या मजुरांना त्यांनी संकलन केलेल्या पानांच्या प्रमाणात प्रोत्साहनात्मक मजुरी म्हणून वाटप करण्याची तरतूद आहे.

सन २०२० तेंदू हंगामात ई-निविदेद्वारे तेंदू घटक / घटक समुहाच्या विक्रीतून एकूण २२.९४ कोटी स्वामित्व शुल्क प्राप्त झाले असून, तेंदू लेखाशिर्षांतर्गत खर्च रु.३३.८२ कोटी (१२% सह) झालेला आहे. त्यामुळे तेंदू हंगामातील एकूण प्राप्त स्वामित्व शुल्कापेक्षा खर्च जादा असल्याने उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार तेंदू संकलनकर्त्या कुटुंब प्रमुखास त्यांनी संकलन केलेल्या पानांच्या प्रमाणात “प्रोत्साहनात्मक मजुरी” म्हणून वाटप करणे शक्य होणार नसल्यामुळे सदर प्रस्तावास शासनाने सहमती दर्शविलेली आहे. त्यामुळे सन २०२० तेंदू हंगामामध्ये प्रोत्साहनात्मक बोनस दर मंजुर करण्यात आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रोजंदारीवरील वन मजूरांना शासन सेवेत कायमस्वरुपी घेण्याबाबत

(२८) ३८२८९ (१८-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील २५ वर्षापासून (सन १९९४ पासून) राज्य वन विभागांतर्गत प्रादेशिक वनविभाग, सामाजिक वनीकरण, वन संशोधन महामंडळ तसेच वन्यजीव विभागांतर्गत पालघर, ठाणे, सांगली, सातारा व नागपूर जिल्हयात रोजंदारी तत्वावर वनमजूर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच वन्यजीव विभागांतर्गत पालघर, ठाणे, सांगली, सातारा व नागपूर जिल्ह्यात वनविकास महामंडळात सन १९८९ ते २०२१ पर्यंत काम करणाऱ्या १० हजारांहून अधिकपात्र-अपात्र वनमजूरांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेने मा.मुख्य वनसंरक्षक, तसेच ठाणे व विभागीय व्यवस्थापक, एफ.डी.सी.एम. ठाणे यांच्याकडे दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजीच्या वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रोजंदारी वन मजुरांना शासन सेवेत कायमस्वरुपी घेण्याबाबत शासनाने यापूर्वीच निर्णय घेतलेला असतांनाही त्याबाबतचा शासन आदेश काढण्यात आला नसल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू शासन आदेश त्वरीत काढावा तसेच माहे नोव्हेंबर, १९९४ ते सन २०२१ अखेरपर्यंत कार्यरत असणाऱ्या वनमजूरांना ३० लाख रुपये भरपाईपोटी सानुग्रह अनुदान म्हणून मिळावे व किमान ५ वर्षे सेवा झालेल्या रोजंदारी वनमजुरांना सेवेत कायम करावे या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वनमजूर, वनकामगार, वनपाल आणि जनरल युनियनच्या वतीने दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजीपासून मुंबई येथे आझाद मैदान येथे आंदोलन सुरु केले असल्याचे व त्याबाबतचे रितसर निवेदन मा.वने राज्यमंत्री यांना दिल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने मान्यता दिल्यानुसार रोजंदारी वन मंजूरांना शासन सेवेत कायमस्वरुपी घेण्याबाबत तसेच अन्य मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. उद्धव ठाकरे (१२-०५-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
राज्यात वन विभागाअंतर्गत रोपवन व तत्सम बाबींकरिता हंगामी स्वरुपात कामाच्या उपलब्धतेनुसार रोजंदारी मजुरांच्या सेवा उपलब्ध करुन घेतल्या जातात.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) दिनांक १ नोव्हेंबर, १९९४ ते सन २०२१ अखेर पर्यंत कार्यरत असणा-या मजूरांना रुपये ३० लाख भरपाईपोटी सानुग्रह अनुदान मिळावे व किमान ५ वर्षे सेवा झालेल्या रोजंदारी वनमजूरांना सेवेत कायम करावे या व अन्य मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वनमजूर, वनकामगार, वनपाल आणि जनरल युनियन या संघटनेच्या वतीने दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजीपासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलन तसेच उपोषण करण्याबाबतचे निवेदन दि.१५ डिसेंबर, २०२१ च्या पत्रान्वये मा.राज्यमंत्री (वने) यांना सादर केले आहे, हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत पॅकेज क्रं.एयु.- १२३ पाडळसिंगी - पिंपळनेर - वडवणी- धारूर - आडस - लोखंडी सावरगाव रस्त्याच्या निविदा प्रस्तावाबाबत

(२९) ३८३०३ (१९-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत पॅकेज क्रं.एयु.- १२३, पाडळसिंगी - पिंपळनेर - वडवणी- धारूर - आडस - लोखंडी सावरगाव रस्ता रामा - २३२ कि.मी. ०/०० ते ८५/०० या कामाची ई- निविदा करण्यास परवानगी देणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री (सा.बां.) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामासाठी निविदा मागविण्यासाठी मान्यता देण्याबाबत मुख्य अभियंता सा.बां. प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामाची निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (२४-०५-२०२२) : (१) मा. लोकप्रतिनिधी यांचे दि. १६.०६.२०२१ रोजीचे मा. वित्त मंत्री यांना दिलेले निवेदन प्राप्त आहे.

(२) मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचे पत्र दिनांक २२/१२/२०२१ अन्वये निविदा मागविणे करिता प्रस्ताव शासनास मान्यते करिता सादर केला आहे.

(३) व (४) सदर प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

पातोडा (ता.जि.हिंगोली) येथे वन जमिनीवरील अतिक्रमण काढण्याबाबत

(३०) ३८५३० (१८-०४-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातोडा (ता.जि.हिंगोली) येथे वन जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासाठी गेलेल्या वन विभागाच्या पथकावर अतिक्रमणधारकांनी दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास दगडफेक केली असून सदर दगडफेकीत वन विभागाच्या दोन अधिका-यांसह ११ जण गंभीर जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वन जमिनीवरील अतिक्रमण एक महिन्यांपूर्वी नोटीस देऊन तातडीने हटवण्याच्या सूचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तद्नुसार अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१०-०५-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रकरणी वन कर्मचारी/अधिकारी यांच्यावर दगडफेक करणाऱ्या ३५ अतिक्रमणधारक व इतर ग्रामस्थ यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन बारांवा, ता.जि.हिंगोली येथे दिनांक ५.१.२०२२ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), हिंगोली यांच्यामार्फत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस प्रशासनामार्फत पुढील तपास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य मार्ग क्रमांक ३७ साकुर फाटा ते व्ही.टी.सी फाटा (ता.इगतपुरी, जि.नाशिक) रस्त्याची झालेली दूरवस्था

(३१) ३८९१२ (२८-०३-२०२२). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग क्रमांक ३७ साकुर फाटा ते व्ही.टी.सी फाटा (ता.इगतपुरी, जि.नाशिक) दरम्यान दहा वर्षापुर्वी नव्याने अस्तित्वात आलेल्या मार्गावर मोठ मोठे खडडे पडल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावरील खडडयांमुळे वाहतूक करण्यास वाहन धारकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरुस्तीकरिता २ कोटी रुपयांचा निधी दोन महिन्यांपुर्वी मंजूर झाला असून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती कधीपर्यंत करण्यात येणार आहे व त्याकरिता निवीदा मागविण्यात आल्या आहेत काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (२०-०४-२०२२) : (१) (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. सद्यस्थितीत सदरील लांबीतील रस्ता खड्डे भरून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत प्रसिध्दीच्या अंकेशंना (ऑडिट व मॉनिटरिंग) साठी बेसिल या संस्थेची नियुक्ती केल्याबाबत

(३२) ३९०९६ (१०-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत प्रसिध्दीच्या अंकेशंना (ऑडिट व मॉनिटरिंग) यासाठी बेसिल या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेसिल संस्थेची नियुक्ती करतांना ई-निविदा काढण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेसिल संस्थेला आतापर्यंत किती रुपयांचे व कोण-कोणत्या विभागाचे कार्यादेश दिले आहेत व किती कालावधीसाठी कार्यादेश दिले आहे याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, बेसिल संस्थेची नियुक्ती करतांना उच्चस्तरीय मान्यता नसतांना बेकायदेशीरपणे नियुक्ती केली असल्याने या संदर्भात संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे काय वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (०९-०५-२०२२) : (१) होय.

(२) होय.

(३) दि.२२.२.२०१९ ते दि.३१.३.२०२१ या कालावधी दरम्यान बेसिल संस्थेला विविध रकमांचे कार्यादेश देण्यात आले.

(४) विविध विषयांतर्गत कामांमध्ये अनियमितता व त्रुटी संदर्भात संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९५९ च्या नियम-८ च्या अंतर्गत कार्यवाही सुरु आहे.

ठाणे जिल्हयातील कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील नदी पात्रालगत नगरपरिषद प्रशासनाने बांधकाम करण्यास परवानगी दिल्याबाबत

(३३) ३९२८६ (१८-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कुळगाव बदलापूर नगर पालिका हद्दीतील नदी पात्रालगत नगरपरिषद प्रशासनाने बांधकाम करण्यास परवानगी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बांधकाम करण्यास परवानगी देतांना पर्यावरण विभागाची परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नदी पात्रालगत बांधकामांना बेकायदेशीरपणे परवानग्या देणाऱ्या नगरपरिषदेच्या तत्कालीन नगर रचनाकार व संबंधितावर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०९-०५-२०२२) : (१) कुळगाव बदलापूर नगरपरिषद मंजूर विकास आराखडयानुसार विकास नियंत्रण नियमावली आणि एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्रमांक-४.११ मधील i ते xxiv नुसार अनुज्ञेय प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी देण्याची तरतूद असल्याने, तसेच विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.११.१ मध्ये नदी पात्रापासून १५ मीटर अंतर सोडून बांधकाम परवानगी देण्याची तरतूद असल्याने त्याप्रमाणे बांधकाम परवानगी देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.
(२) प्रस्तावामध्ये नियोजित बिल्टअप क्षेत्र हे २०,००० चौ.मी.पेक्षा जास्त असल्यास प्रस्तावाला पर्यावरण विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार बाधंकाम परवानगी देतांना पर्यावरण विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहील, अशी अट नमूद करुन बांधकाम परवानगी देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.
(३) नदीपात्रालगत कोणतीही चुकीची परवानगी दिली नसल्याने कारवाई करण्यात आली नसल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव (जि.बुलढाणा) येथे २० न्यायदान कक्ष असलेल्या नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

(३४) ३९२९९ (१८-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथे २० न्यायदान कक्ष असलेल्या नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबतचा अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग खामगाव या कार्यालयाचे पत्र क्रमांक २९५९/ प्रशा-१/२०२१ दिनांक ७/६/२०२१ अन्वये माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जिल्हा न्यायालय बुलढाणा यांच्याकडे मंजुरीच्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खामगाव येथे अस्तित्वात असलेली न्यायालयाची इमारतीची क्षमता कमी असल्यामुळे व भविष्यात खामगाव जिल्हा झाल्यास येथे असलेले न्यायदान कक्ष अपुरे पडणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावित २० न्यायदान कक्ष असलेले नवीन न्यायालयीन इमारत बांधकाम करणे या कामास अर्थसंकल्प २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (०२-०५-२०२२) : (१) होय हे खरे आहे
(२) याबाबत आताच भाष्य करता येणार नाही.
(३) जिल्हा व तालुकास्तरावरील न्यायालयांचे सनियंत्रण मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे असल्याने, जिल्हा व तालुकास्तरावरील नवीन न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाचे प्रस्ताव मा.जिल्हा न्यायालय यांचेकडून मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी सादर केले जातात. तदनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून सदर प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मंजूरी निधीसाठी सादर करण्यात येतात.

त्यानुसार खामगांव येथे २० न्यायदान कक्ष असलेली इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मा.जिल्हा न्यायालय, बुलढाणा यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव मा.जिल्हा न्यायालय, बुलढाणा यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर केला. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी "सद्य:स्थितीत जेवढे न्यायाधीश कार्यरत आहेत तेवढेच न्यायदान कक्ष बांधण्यात यावे" असे निर्देशीत करुन प्रस्ताव पुन्हा मा.जिल्हा न्यायालय यांना पाठविला आहे. सद्य:स्थितीत जिल्हा न्यायालय, बुलढाणा यांनी १२ न्यायदान कक्ष असलेली इमारत बांधण्याचे अंदाजपत्रक तयार करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे. सबब, सदर प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) विलंब झालेला नाही.

मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण पुनर्रचित गाळे विभागातून बदली झालेल्यां अधिकाऱ्यांची बढतीनंतरही त्याच विभागात नियुक्ती झाल्याबाबत

(३५) ३९८५८ (२८-०३-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण पुनर्रचित गाळे विभागातून बदली झालेल्या अधिका-यांची बढतीनंतरही त्याच विभागात नियुक्ती करु नये अशा आशयाच्या मागणीचे एक सविस्तर निवेदन मंडळाचे सभापती विनोद घोसाळकर यांनी मा. गृहनिर्माण मंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यामसुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गृह निर्माण विभागाने संबंधित अधिका-यांची त्याच विभागात वरिष्ठ पदावर नियुक्ती केली आहे काय, तसेच म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या सभापतींची मागणी मान्य न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आला आहे व तद्नुसार अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०८-०४-२०२२) : (१) होय.
(२), म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवर सह मुख्य अधिकारी या संवर्गातील २ च पदे असल्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश / मान्यतेने पदोन्नत अधिकाऱ्यांना सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळ या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे.
(३) व (४), प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयातील स्व.डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त वृत्तपत्राव्दारे शासकीय जाहिराती देण्याबाबत

(३६) ४००५० (२८-०३-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील स्व.डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जन्मदिनी शासनामार्फत राज्यातील कोणत्याही वृत्तपत्रांना शासकीय जाहिरात देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्व. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जन्मदिनी वृत्तपत्रांतून शासकीय जाहिराती प्रसिध्द करण्याबाबतची मागणी अमरावती येथील पत्रकार संघटनेने मा. मुख्यमंत्री याच्याकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान एका निवेदनाव्दारे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन स्व. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त वृत्तपत्रातून शासकीय जाहिराती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (११-०५-२०२२) : (१) होय

(२) होय

(३) जाहिरात वितरण धोरणाकरिता शासनाने शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८, दिनांक २० डिसेंबर, २०१८ शासन निर्णयान्वये केली आहे. सदर नियमावलीच्या नियम क्र. ४, ६, ७ अन्वये मान्यताप्राप्त यादीतील सर्व वृत्तपत्रांना एका आर्थिक वर्षात महात्मा फुले जयंती (११एप्रिल), डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल), महाराष्ट्र दिन (१मे), छत्रपती शाहू महाराज जयंती (२६ जून), स्वातंत्र्य दिन (१५ ऑगस्ट), दिवाळी दर्पण दिन (६ जानेवारी), प्रजासत्ताक दिनांक (२६ जानेवारी) आणि शिवजयंती (१९ फेब्रुवारी) या निमित्त दर्शनी जाहिराती निधी उपलब्धतेनुसार मान्यताप्राप्त दराने तसेच १ ऐच्छिक दर्शनी जाहिरात वितरीत करण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे. या व्यतिरीक्त इतर महापुरुषांच्या जन्मदिनी जाहिरात करण्याचे शासनाचे धोरण नाही. यास्तव डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मदिननिमित्त वृत्तपत्रातून शासकीय जाहिराती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धर्मादाय रुग्णालयांमध्ये सवलतीच्या दरातील जेनरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत

(३७) ४००७८ (३१-०३-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धर्मादाय रुग्णालयांमधील औषधांच्या दुकांनामध्ये सद्या सवलतीच्या दरात जेनरीक औषधे उपलब्ध होत नसल्याने रुग्णालयाच्या देयकांबरोबर औषधांचीही देयके देखील लाखो रुपयांपर्यंत जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धर्मादाय रुग्णालयांमध्ये सवलतीच्या दरात जेनरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२१-०४-२०२२) : (१) नाही.

यासंदर्भात नमूद करण्यात येते की, ज्या धर्मादाय रुग्णालयांची स्वतःची औषधांची दुकाने आहेत व त्यांचेकडे जेनरीक औषधे उपलब्ध आहेत अशा धर्मादाय रुग्णालयात लाभार्थी रुग्णांना मा. उच्च न्यायलय, मुंबई यांनी रिट याचिका (पीआयएल) क्रमांक ३१३२/२००४ मध्ये आदेशित केलेल्या योजनेतील तरतूदीनुसार औषधे पुरवणे बंधनकारक आहे. त्यानुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने ती पुरवली जातात.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहरातून जाणा-या मुंबई-नागपूर महामार्गावर अपघात घडत असल्याबाबत

(३८) ४०२१२ (३०-०३-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहरातून जाणाऱ्या मुंबई-नागपूर महामार्गावर मोतीतलावाजवळील वळण रस्त्यावर दररोज अपघात घडत असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी तेथील नागरिकांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार प्राधिकरणाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०९-०५-२०२२) : (१) सिंदखेडराजा शहरातून (जि.बुलढाणा) जाणा-या मुंबई-नागपूर महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते. हे खरे आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(२) व (३) सदर मागणीनुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने सद्यस्थितीत अस्तित्वातील दोन पदरी महामार्गावर या ठिकाणी देखभाल व दुरुस्तीच्या कामांतर्गत तात्पुरत्या उपाययोजना म्हणून वळणावर रुंदीकरण करुन वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने रस्त्याच्या कडेला सेफ्टी बॅरीअर्स लावण्यात आले आहेत. तसेच या ठिकाणी वाहनांचा वेग मर्यादीत रहावा याकरिता रम्बल स्ट्रिप्स करण्यात आले आहेत.
याखेरीज सदर ठिकाणचा समावेश असलेल्या जालना ते पुलगाव या NH-७५३-सी राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण प्रस्तावीत असून त्यादृष्टिने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरिता एजन्सी नियुक्त करण्याची निविदा प्रक्रिया सुरु आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

रत्नागिरी-साखरपा-देवडे धुमकवाडी या रस्त्याचा विकास करण्याबाबत

(३९) ४०४८० (१९-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रत्नागिरी कोल्हापूर महामार्गाच्या जोडणाऱ्या आंबा घाटाला पर्यायी जवळचा मार्ग म्हणून रत्नागिरी-साखरपा- देवडे धुमकवाडी या सार्वजनिक विभागांतर्गत येणाऱ्या रस्त्याला अग्रक्रम देऊन सर्वेक्षण भूसंपादनासाठीचे निवेदन स्थानिक नागरिकांनी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री याना दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरमान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व तालुके या महामार्गाला जोडणार असल्याने व्यापाराच्या दृष्टीने कोल्हापूर बाजार पेठेतील व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन शासनाच्या महसुलात वाढ होणार आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, रत्नागिरी-साखरपा-देवडे धुमकवाडी या रस्त्याचा विकास झाल्यास पर्यटनाला मोठ्या प्रमाणात संधी मिळून स्थानिकांना रोजगार मिळणार असल्याने उक्त रस्त्याचे सर्वेक्षण भूसंपादन करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करण्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (३०-०५-२०२२) : (१) व (२) होय. हे खरे आहे.
रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील देवडे भोवडे ते विशाळगड जि. कोल्हापूर हे दोन जिल्हे जोडणारा नवीन घाट मार्ग करण्याबाबत मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांच्या सोबत दि.०७.०१.२०२२ रोजी बैठक पार पडली आहे. सदर घाट मार्ग झाल्यास संगमेश्वर तालुका कोल्हापूर जिल्ह्याशी जवळच्या मार्गाने जोडला जाणार आहे.
(३) घाट मार्गाचे प्राथमिक सर्वेक्षण करून नियोजित रस्त्याचा आखणी मार्ग निश्चित करणे.तसेच भूसंपादन व वनजमिनीची आवश्यकता असल्यास वनखात्याच्या परवानगीचा

प्रस्ताव करणे आवश्यक आहे. सदर कामाकरीता सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकरीता प्राधान्यक्रम, मंजूरी, निधी व निकषानुसार काम करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयाचे कनिष्ठ अभियंत्यांची रिक्त पदे भरण्याबाबत.

(४०) ४१३९८ (१८-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील कनिष्ठ अभियंत्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत बल्लारपूर लोकप्रतिनिधीनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (१३-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे. चंद्रपूर जिल्हयातील कनिष्ठ अभियंत्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींनी दि.१२ जानेवारी, २०२२ रोजी लेखी निवेदन सादर केले आहे.
(२) वित्त विभाग, शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये नवीन पदभरतीवर निर्बंध होते. वित्त विभाग, शासन निर्णय दि.१२.०४.२०२२ नुसार पदभरती संदर्भातील काही निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर महापालिकेतील घरफाळा विभागातील गैरव्यवहारासंदर्भातील
चौकशी समितीचा अहवाल जाहिर करण्याबाबत

(४१) ४१७०५ (२५-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महापालिकेतील घरफाळा विभागातील गैरव्यवहारासंदर्भातील चौकशी समितीचा अहवाल जाहिर करण्याची मागणी कोल्हापूर शहर व जिल्हा नागरी कृती समितीने महापालिका आयुक्त यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार सदरचा अहवाल केव्हापर्यंत जाहिर करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, या अहवालात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०९-०५-२०२२) : (१) अशा आशयाची मागणी महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्याची वस्तूस्थिती कोल्हापूर महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झाली असून चौकशी अहवालावरुन जबाबदार कर्मचाऱ्यांवर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच संबंधित कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु असल्याचे कोल्हापूर महानगपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

यवतमाळ जिल्हा परिषद बांधकाम विभागाला कायमस्वरुपी अभियंता मिळण्याबाबत

(४२) ४१९०९ (१८-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रशांत ठमके निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागेवर पाणी पुरवठा योजनेच्या पुसद येथील उपअभियंता यांना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रभार देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याच्यामुळे विकास कामे होत नाही व शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (११-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
श्री. प्रशांत ठमके, प्रभारी उप अभियंता हे दि. ३०/०७/२०२१ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या जागेवर ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, पुसद येथील उप अभियंता यांचेकडे प्रभार देण्यात आला.
दरम्यानच्या काळात दिनांक ०३/१२/२०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये उप अभियंता, जि. प. बांधकाम उप विभाग, महागाव हे पद पदोन्नतीने भरण्यात आले असून सदर उप अभियंता दिनांक ०४/०४/२०२२ रोजी रूजू झाले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ मधून सुळेवाडी ग्रामपंचायत (पिलीव) गायरान जमिन वगळण्याबाबत

(४३) ४३३६२ (१८-०४-२०२२). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ मधून सुळेवाडी ग्रामपंचायत

(पिलीव) ही गायरान जमिन वगळण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (माळशिरस) यांनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१०-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) मौजे सुळेवाडी (पिलीव) येथील गट नं. ७८८ चे क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ मधून वगळून सुळेवाडी ग्रामपंचायत यांच्या नावे करण्याबाबत सदर ग्रामपंचायतीने तसेच मा. लोकप्रतिनींधीनी मागणी केली आहे.

प्रश्नांकित क्षेत्र सद्य:स्थितीत भारतीय वन अधिनिमय, १९२७ चे कलम २० अन्वये अंतिमत: राखीव वन म्हणून अधिसूचित झाले असल्याने सदर क्षेत्राचा वैधानिक दर्जा “राखीव वन” असून त्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० तसेच वन संबंधित इतर कायदे लागू होतात.

यास्तव, सदर क्षेत्र “राखीव वनातून” वगळावयाचे झाल्यास त्यास मा.सर्वोच्च न्यायालय व केंद्र शासनाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच सदर वनक्षेत्रामध्ये कोणतेही वनेत्तर कामे करावयाची झाल्यास त्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अन्वये केंद्र शासनाची मंजुरी घेणे बंधनकारक आहे.

तथापि, ग्रामपंचायतीने तसेच मा.लोकप्रतीनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयाची स्थापना करण्याबाबत

(४४) ४३४४७ (०१-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील प्रस्तावित अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी वरिष्ठ स्तर या न्यायालयाची मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांच्या मान्यतेनुसार मा.जिल्हा न्यायाधीश परभणी यांनी सदर स्थळाची पाहणी करून अहवाल दिला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या अहवालानंतरही जिंतूर मतदार संघातील परभणी जिल्हा सत्र न्यायालय व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयात त्यांच्या कोठ्या पेक्षाही जास्त भरपूर फौजदारी व दिवाणी प्रकरणे प्रलंबित असून पक्षकारांना निकाल मिळवण्यासाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिंतूर तालुका जिल्हयामध्ये सर्वात मोठा विस्तीर्ण तालुका असून यामध्ये चार पोलीस स्टेशन १७३ गावांचा समावेश आहे सदर गावातील नागरिकांची विशेषतः महिलांची जवळपास २०० ते २५० पोटगीची तसेच कौटुंबिक अत्याचाराची प्रकरणे प्रतिबंधक कायद्याखाली प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणे दाखल करण्यासाठी महिला व नागरिकांना त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर परभणी येथे जाण्यासाठी प्रवासाची व्यवस्था नसल्याने प्रकरणे प्रलंबित राहिल्यामुळे ते न्यायापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, संबंधित न्यायालयाच्या प्रस्थापनेसाठी शासनाकडून प्रलंबित असणाऱ्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१२-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

राज्यात कोठे व कोणते न्यायालय स्थापन करावयाचे याबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून राज्य शासनास शिफारस करण्यात येते व तद्नंतर त्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येतो. जिंतूर, जिल्हा परभणी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधिश तसेच, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय स्थापन करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणताही प्रस्ताव मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेमार्फत शासनास प्राप्त झालेला नाही.

तत्कालीन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश परभणी यांनी जिंतूर येथे दिनांक १९.०८.२०२० रोजी वकील संघ जिंतूर यांचेसोबत जागेची पाहणी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल मा.उच्च न्यायालय मुंबई यांना पाठविला असल्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश परभणी यांनी दिनांक २७.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कारला व कुमठा (ता.औसा, जि.लातुर) या भूकंपग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याबाबत..

(४५) ४३५६४ (३०-०३-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारला व कुमठा (ता.औसा, जि.लातूर) या भूकंपग्रस्त गावांच्या पुनर्वसनासंदर्भात बैठक आयोजित करण्याबाबत औसा येथील स्थानिक लोकप्रतिनिधीनी निवेदनाद्वारे व भ्रमणध्वनीद्वारे सन २०२०-२०२१ मध्ये सातत्याने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने दिलेल्या निवेदनास शासन नियमांनुसार उत्तर देणे वा त्यांना त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने झालेल्या उचित कार्यवाहीबाबत अवगत केले नाही त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधीचा अवमान झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (२९-०४-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) मा. श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. औसा यांनी दि. १५.०२.२०२१ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, कोव्हीड महामारीच्या कारणास्तव बैठक आयोजित करणे शक्य झाले नाही.

त्यानंतर श्री. अभिमन्यु पवार, विधानसभा सदस्य औसा यांनी दिनांक ११.१२.२०२१ रोजी मौजे कारला व कुमठा ता. औसा, जि. लातूर या गावांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात मा.उपमुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या त्या निवेदनाच्या अनुषंगाने मा. उपमुख्यमंत्री कार्यालयामार्फत बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे मसलगा (खुर्द) (ता.औसा, जि.लातूर) या पुर्नवसित गावाचे क्षेत्र गावठाण म्हणून घोषित करण्याबाबत

(४६) ४३६६५ (१०-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपात औसा तालुक्यातील मसलगा या उध्द्वस्त झालेल्या गावांचे पुनर्वसन शासनाने केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसित मसलगा गावासाठी संपादित क्षेत्र मूळ शेतकऱ्यांच्या मालकीतून कमी करण्यात न आल्यामुळे सदरील पूनर्वसनासाठी संपादित जमीन ग्रामपंचायत किंवा शासनाच्या मालकी हक्कात नोंद करण्याबाबत व मूळ शेतकऱ्यांच्या मालकीतून कमी करण्याबाबत व पुर्नवसित गाव गावठाण म्हणून घोषित करण्याबाबत ग्रामपंचायत मसलगा यांनी तहसिलदार औसा यांच्याकडे दिनांक २७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (२९-०४-२०२२) : (१) सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपात औसा तालुक्यातील मसलगा या उद्ध्वस्त झालेल्या गावाचे पुनर्वसन खाजगी जमीन खरेदी करुन श्री. साधु वासवानी मिशन, पुणे या सेवाभावी संस्थेने केले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणात ज्या खाजगी जमिनीवर पुनर्वसन करण्यात आले आहे त्याबाबतच्या खरेदीची ग्रामपंचायत मसलगा (खु.) यांनी सादर केलेली कागदपत्रे भारतीय नोंदणी कायदा १९०८ चे कलम १७ नुसार नोंदणीकृत नाहीत. तसेच, ठरावपत्रक लिहून घेणार श्री. साधु वासवानी मिशन, पुणे व लिहून देणार - श्री. विश्वंभर दादाराव पवार, श्री. केशव विठोबा पवार, श्री. भास्कर माधवराव पवार, श्रीमती भीमाबाई भ्र. विठ्ठल पवार व श्री. व्यंकट वामन पवार यांनी करुन दिलेले ठरावपत्रक हे १० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर करुन दिलेले आहे. त्यामुळे

भुकंप पुनर्वसित जमिनीवरील मूळ मालकाचे नाव कमी करुन अध्यक्ष, साधु वासवानी मिशन, पुणे अथवा ग्राम पंचायत मसलगा खु. यांच्या नावे करता येत नसल्याबाबत तहसीलदार, औसा यांनी दि. १४.०१.२०२२ अन्वये ग्रामपंचायत, मसलगा, ता.औसा, जि. लातूर यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गोंदिया जिल्ह्यासहित महाराष्ट्रात सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत.

(४७) ४३६८५ (०५-०४-२०२२). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यासहित महाराष्ट्रात सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी दिनांक ८ ते ९ ऑगस्ट २०१८ या कालावधीत संप पुकारला असून शासनातर्फे संप मागे घेण्याबाबत सूचित केल्याने संप मागे घेण्यात आला परंतु सदर कालावधीतील वेतन शासनातर्फे अद्याप अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनातर्फे या तीन दिवसीय संपाचे वेतन अदा करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने संप कर्मचाऱ्यांचे दिनांक ८ ते ९ ऑगस्ट २०१८ या कालावधीतील वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०५-२०२२) : (१) हो, हे खरे आहे.
(२) व (३) तीन दिवसाच्या कालावधीत पुकारलेल्या संपामध्ये जे शासकीय अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते, त्यांची अनुपस्थिती सेवेतील खंड न समजता “असाधारण रजा” म्हणून नियमित करण्यात यावी असे दि.२८ मे २०१९ च्या परिपत्रकान्वये आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यात शासन आदेशानुसार संप कालावधीतील वेतन कपात करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महात्मा ज्योतिबा फुले चित्रपट निर्मितीच्या समितीच्या कामकाजाबाबत

(४८) ४३८७६ (१०-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतिबा फुले चित्रपट निर्मिती या शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेची पूर्तता करण्यासाठी चित्रपट निर्मितीचे काम मे.एलोक्यन्स मिडीया प्रा.लि.मुंबई या कंपनीस दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ कार्यादेशाने व करारपत्राने देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चित्रपट निर्मितीच्या समितीमध्ये तत्कालीन संचालक (प्रशासन) श्री. अंबेकर यांचा समावेश नसतानाही करार नियमबाहय करुन शासनाची फसवणूक केली व संबंधित नस्ती गहाळ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी तत्कालीन संचालकांनी बेजबाबदार व नियमबाहय केलेल्या कामाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित नस्ती गहाळ झाल्याने याप्रकरणी तत्कालीन संचालकावर फौजदारी कारवाई करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (०९-०५-२०२२) : (१) होय.
(२) चित्रपट निर्मिती प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी शासनामार्फत गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीमध्ये संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तथापि, महासंचालनालय व चित्रपट निर्मिती संस्था यांच्यामध्ये झालेल्या करारावर तत्कालीन संचालक, (माहिती) (प्रशासन) यांनी स्वाक्षरी संचालक या नात्याने केली असून करार केलेली महासंचालनालयाची नस्ती गहाळ झाली आहे.
(३) याबाबत शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९५९ च्या नियम ८ अंतर्गत चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) अद्याप नाही.
(५) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जिवनकार्यावर आधारित चित्रपट निर्माण करण्यासाठी झालेला करार करोनाच्या पार्श्वभूमीवर चित्रपटाच्या चित्रीकरणावर बंदी असल्याने कालबाहय झाला असल्याने नव्याने करारनामा करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

चंद्रपूर जिल्हयातील प्रशासकीय विभागातील पदे रिक्त असल्याबाबत.

(४९) ४३८८३ (२८-०३-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील प्रशासकीय विभागात अनेक पदे रिक्त असल्यामुळे सामान्य नागरिकांना प्रशाकीय कामासाठी विलंब व नाहक त्रास होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीकडून वारंवार मागणी केली जात आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयात विविध विभागात एकूण किती पदे रिक्त आहे व ती भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

श्री. उद्धव ठाकरे (०२-०५-२०२२) : (१) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार चंद्रपूर जिल्हयातील शासकीय कार्यालयांमधील रिक्त पदांमुळे नागरिकांना मिळणाऱ्या शासकीय सेवा प्रभावित होत असल्या तरी उपलब्ध अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देऊन प्रशासकीय कामकाज सुरळीतरीत्या पार पाडण्यात येत आहे.
(२) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार तहसील कार्यालय, चिमूर, नागभिड व अपर तहसील कार्यालय, भिसी तसेच राजूरा विधानसभा क्षेत्रातील तहसीलदार व नायब तहसीलदार यांची रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) चंद्रपूर जिल्हयातील प्रशासकीय विभागात गट-अ ते गट-ड संवर्गातील एकूण ५४१९ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने वित्त विभागाच्या पदभरतीबाबतच्या प्रचलित धोरणानुसार / कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सेलू (जि.परभणी) तालुका येथे दिवाणी न्यायालय इमारतीचे बांधकाम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

(५०) ४३९५५ (०१-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) तालुका येथे दिवाणी न्यायालय इमारतीचे बांधकाम निधीअभावी प्रलंबित असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिवाणी न्यायालय इमारत बांधकामासाठी शासनाने २८ कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निधी वितरीत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास वारंवार विनंती करूनही अद्याप निधी वितरित केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निधी तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०४-२०२२) : (१) अंशत: खरे आहे
सेलू (जि.परभणी) येथी दिवाणी न्यायालयाची इमारत बांधण्याकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०२१ च्या पत्रान्वये रु.२५.३४ कोटी इतक्या किंमतीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. तदनंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव यांनी सदर प्रस्तावास रु.१५.९० कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीस मान्यता देण्यास सहमती दर्शविली. सदर कार्यवाहीस काही कालावधी लागलेला आहे.

(२) हे खरे नाही.

विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक ७ मार्च २०२२ अन्वये रु.१५.९० कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) व (४) सदर इमारतीच्या बांधकामास विधि व न्याय विभाग शासन निर्णय दिनांक ७ मार्च २०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. तद्नंतर मा.विधानमंडळाच्या सन २०२२-२३ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बाबीद्वारे सदर कामाकरीता प्रथम टप्प्यात रु.१.५० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सबब, सदर कामास मंजूर करण्यात आलेला निधी (प्र.मा.एवढा) बांधकामाच्या प्रगतीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रयोजन आहे.

(५) विलंब झालेला नाही.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.